ISSN 2394-5303

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

## Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN-443204.

■ NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL ■

Special Issue, December 2017

Printing Area™

International Multilingual Research Journal

IMPACT FACTOR 4.002

20/2017




330

# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : II)

Chief Editor:
Dr. Anant Madan Awati



Scanned with CamScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 4.002(IIJIF) | Printing Area™ International Research Journal | December 2017 Special Issue/02 


27) महिला सबलीकरण आणि राजकारण
प्रा. रमेश एकनाथ भारुडकर, बीड || 83

28) महिला सक्षमीकरण आणि राजकारण
प्रा. डॉ. कृष्णा आ. माहुरे, अकोला || 85

29) सामाजिक क्षेत्रात महिलांची स्थिती
प्रा. अनिल ठाकरे, मुर्तिजापुर || 88

30) पंचायत राज व्यवस्था आणि महिला सक्षमीकरण एक दृष्टीक्षेप
प्रा. एस. एस. तायडे, अकोला || 90

31) राजकारणातील स्त्री शक्ती — धन्य जिजाई
प्रा. कु . कल्पना रामकृष्ण राउत (इंगळे), बुलडाणा || 93

32) महिला सबलीकरण व राजकारण
प्रा.डॉ.आर.यु.हिरे, यवतमाळ || 95

33) महिला सक्षमीकरण व राजकारण
प्रा.डॉ. शिवप्रसाद पंजाबराव वायाळ, वाशीम || 97

34) राजमाता जिजाऊ यांचे राजकीय कार्य
डॉ. विनोद बाबुराव बोरसे, औरंगाबाद || 98

35) भारतातील हुंडा बळी समस्या व महिला सशक्तीकरणातील प्रशासनाची भुमिका : एक अभ्यास
सहा.प्रा. आकाशे एस.एम., औंढा नागनाथ . || 101

36) शासनाची भुमिका आणि महिला सबलीकरण
प्रा. डॉ. संतोष शं. इंगोले, वाशिम || 104

37) राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण एक दृष्टीक्षेप
प्रा.सौ.वैशाली रा. मोरे, बुलढाणा || 106

38) महिला सबलीकरण व भारतीय संविधान
प्रा. अमोल भाऊराव बंड, अमरावती || 108


https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



330

Scanned with CamScanner

देण्यात येते. यासाठी महिला मंडळांणा अनावर्ती अनुदान २८५००/- रुपये व ६ महीन्याच्या एका प्रशिक्षण सत्रासाठी २१५००/- रुपये प्रमाणे ४३००/- रु अनुदास देण्यात येते तसेच दरमहा ७५/- रुपये विद्यावेतन सुध्दा देण्यात येते.

**५) व्यवसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन योजना :**

आर्थिक दृष्टया मागास कुटुंबातील इयत्ता १० वी पास झालेल्या मुलीना शासनमान्य प्रशिक्षण केंद्रातुन पॅकिंग, टेलीफोन ऑपरेटर, टंकलेखन,संगणक, नर्सिंग, आय.टि.आय. मधील प्रशिक्षण देवून शैक्षणिक दृष्टया स्वतःचे पुनर्वन करण्यासाठी दरमहा १००/- रुपये विद्यावेतन देण्यात येते.

**६) स्वयंरोजगारासाठी महिलांना व्यक्तीगत अनुदान :**

निराधार, निराक्षिपत, परित्यक्या, विधवा, नैतिकदृष्टया संकटात सापडलेल्या, आंथकदृष्टया मागास महिलेस स्वतःच्या कुटुंबास आर्थिक हातभार लावण्यासाठी फळे, भाजीपाला, खादपदार्थ. इ. व्यवसायासाठी ५००१/- अनुदान एकदाच देण्यात येते.

**७) निराश्रीत विधवाच्या मुलीसाठी विवाह अनुदान :**

निराश्रीत व आर्थीक मागास विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहासाठी २०००/- रु. शासनामार्फत अनुदान देण्यात येते त्यासाठी मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पुर्ण असावे लागते.

**८) बहुउद्देशिय महिला केंद्र :**

महिलांना केंद्र शासन व राज्यशासनाच्या विविध योजनाची व उपक्रमाची माहिती देणे. कायदे विषयक मार्गदर्शन माहिती देणे. शिक्षण, प्रशिक्षण निवडण्यासाठी मार्गर्शक करणे. वाचनालय - आपदग्रस्त महिलांना आधार देणे अशा सेवा देणाऱ्या केंद्रांना आवर्ती अनुदान १३७६००/- रुपये व अनावर्ती २७४५००/- रु देण्यात येते.

**शेवटी :** ज्ञानाच्या भुमिकेसोबतच समाजाचे प्रोत्साहन आवश्यक आहे.

**संदर्भ :-**

१) साळुंके आ.ह.हिंदु सस्कृती आणि स्त्री , लोकवाड:मय गृह मुबई १९९८
२) शाह घनशाम : भारतीय सामजिक चळवळ, अनुवाद प्राचि चिकटे, डायमंड प्रकाशन पुणे.२००५
३) योजना ऑक्टो- २००८
४) योजना नोव्हे. -२००८
५) योना जाने. - २००९
६) पंचायतीराज एक विश्लेषणात्मक परामर्श डॉ.वि.जी.दाडंकर
७) यशमंथन एप्रिल -जुन -२००६
८) राष्ट्रवादी - मासिक -ऑक्टो -२००६

**37**

# राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण एक दृष्टीक्षेप

प्रा.सौ.वैशाली रा. मोरे,
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महा.मेहकर
जि.बुलढाणा

**प्रस्तावना :—**

राज्याची विकास प्रकीया गतीमान करण्यासाठी महिलांच्या सर्वांगीण प्रगतीला केंद्रस्थानी ठरवुन शासनाने महत्वपुर्ण पावले उचलली आहेत. हया विकास प्रकीयेत महिलांना सहभागी केल्याशिवाय पुढचे पाऊल टाकता येणार नाही. कोणत्याही समाजात स्त्रीयांना त्यांचे मुलभूत अधिकार, समानतेची वागणुक, वैचारीक स्वातंत्र्य मिळाल्यास स्त्री सबलीकरणाच्या संकल्पनेनुसार स्त्रीयांची सर्वांगीण प्रगती होईल. एक सक्षम स्त्री आपल्या कुटूंबाचा विकास करू शकते. व कुटूंबाचा विकास झाला तर संपुर्ण समाजाचा विकास होऊन पर्यायाने राष्ट्राची प्रगती होते. आज स्त्री,चुल व मुल हयापुरती मर्यादीत राहली नसुन महिला आज स्थानिक शासन संस्थेच्या सत्तेत येऊन निर्णय प्रकीयेत सहभागी झाल्या आहेत. ग्रामपंचायत ते पंतप्रधान, राष्ट्रपतीपदी अनेक महिला विराजमान झाल्या आहेत. आज महिला सबलीकरणाची जाणीव व गरज यामुळे महिलेला आत्मभान व आत्मसन्मानाची नविन पर्वनी गवसली आहे.

**महिला सक्षमीकरण व राष्ट्रीय धोरण :—**

भारतीय राज्यघटनेच्या सरनामा, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्य व मार्गदर्शक तत्वे यामध्ये स्त्री—पुरूष समानता हे तत्व व्यक्त होते. लोकशाही व्यवस्थेच्या चौकटीमध्ये कायदे, विकासाची धोरणे, नियोजन व कार्यक्रम यामध्ये महिलांना केंद्रीभुत मानले गेलेले आहे. केंद्र व राज्य शासनाची सार्वजनिक ध्येय व धोरण, कायदे इत्यादीमुळे महिलांच्या सर्वांगीन



330

कल्याणकारी योजना सुरु करुन महिलांना सक्षम करण्याचे प्रयत्न केले आहेत. यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम १९८७, महिला समृध्दी योजना -१९९३, राष्ट्रीय महिला कोष १९९२-९३, इंदिरा महिला योजना-१९९५, महिला व बालविकास कार्यक्रम -१९९७, बालीका समृध्दी योजना, महिला बचत गट, यासर्वांबरोबर केंद्रीय समाज विकास बोर्डाची स्थापना करुन महिलांना अनुदार, बालक आणि दुर्लक्षित घटक यांना मदत केली आहे.

**महिला सबलीकरण म्हणजे काय ?**

सक्षमिकरणामध्ये स्त्रियांनी स्वसामर्थ्याची जानीव करुन देणे, सामाजिक, आर्थीक सास्कृतीक क्षेत्रात स्त्रियांना विषेश स्थान देणे, देश पातळीवर सामाजिक राजकीय आणि आर्थीक प्रश्नावर चर्चेत सहभागी होणे. स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, रोजगार यामध्ये समान संधी, समान वागणुक, स्त्रिया व मुलीवर सतत होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे.मृदसंधारण, वनीरकण, दुग्ध व्यवसाय आणि शेतीशी संबंधित उद्योगांचे प्रशिक्षण देणे, पशु पालन, कुक्कुट पालन, मत्स्य शेती यामध्ये महिलांचा सहाभाग वाढविणे, स्त्रियाच्या कामाच्या ठिकाणी पाळणाघरे वृध्दाश्रम, शैक्षणिक संस्था यांचे जाळे वाढविणे, आहार, आरोग्य, पिण्याचे शुध्द पाणी याबाबत योजना आखणे बचत गटांच्या माध्यमातुन स्त्रियाना सक्षम बनविणे. महीला सक्षमिकरणासाठी भारत सरकारने खालील प्रमाणे वेगवेगळे कायदे आणि योजना तयार आहेत. त्या पुढील प्रमाणे.

**१) महीलांच्या कल्याणसंबंधिचे विविध कायदे (महिला सबलीकरणासाठी शाशनाचे पुढील कायदे)**

अ) हुंडाबंदी अधिनियम -१९९६ ब) अनैतिक व्यापार अधिनियम - १९५६ क) मातृत्व लाभ अधिनियम - १९६१

ड) सतिप्रथा निवारण अधिनियम -१९८७ इ) घरगुती हिंसाचार प्रतिबंध अधिनियम-२००६

**२) महिलांच्या विकासाबाबतचे सामाजिक कायदे**

अ) बालविवाह नियंत्रण अधिनियम -१९२९ ब) हिंदु विवाह अधिनियम -१९५५ क) हिंदु वारसा हक्क कायदा -१९५६

ड) भारतीय घटस्फोट अधिनियम -१९९९ इ) कुटुंब न्यायालय अधिनियम -१९८४

**३) स्त्री पुरुष समनितिविषयक राज्यघटनेतील तरतूदी -**

अ) घटनेतील कलम -१४ नुसार राजकीय, आर्थीक व सामाजिक क्षेत्रात समान अधिकार आणि समान संधी

ब) कलम १५ नुसार लिंगावर आधारीत भेदभाव करण्यात प्रतिबंध

क) कलम ३९ नुसार जीवन जगण्याच्या साधनामध्ये समान संधी तसेच समान कामासाठी समान वेतन.

ड) कलम ४२ नुसार स्त्रियांना जीवनमानाचा योग्य दर्जा देण्यासाठी मानवी हक्क करणे तसेच प्रसुती विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याचे तरतूद.

इ) कलम ५१ नुसार महिलाबाबत अपमानजनक प्रथा, रुढी, परंपरा यांचा त्याग करणे.

**४) महिलांच्या शिक्षणासाठी योजना :**

विद्यापीठ शिक्षण आयोग, माध्यमिक शिक्षण आयोग, राष्ट्रीय महिला शिक्षण समिती. राष्ट्रीय महिला परीषद, कस्तुरबा गांधी शिक्षण योजना, मौलना आझाद राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे या माध्यमातुन महिलांचे मोफत व सक्तीचे शिक्षण याद्वारे महिलांचा विकास होत आहे.

**महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना:**

**१) शासकीय महिला वसतिगृहे :**

सदर योजनेमध्ये १६ ते ६० वर्ष पर्यतच्या निराधार, निरीक्षित व परीत्यक्त्या कुमारीमाता. संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महीलांना आश्रय, संरक्षण व मुलभुत सुविधा पुरवून त्यांचे नोकरी व्यवसाय आणि विवाह यामार्गे पुनर्वसन करण्याकरीता शासनामार्फत १६ जिल्हयात एकुण २० महिला वसतीगृहे कार्यरत आहेत. गरजू महिला स्वइच्छेने वसतीगृहात प्रवेश घेऊन २ ते ३ वर्ष राहू शकतात.

**२) महिला संरक्षण ग्रहे :**

अनैतिक व्यापार अधिनियम १९५६ अन्वये वेश्या व्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या महिलांना व स्वच्छेने दाखल होणाऱ्या महिलांना संरक्षण देऊन पुनर्वसन करण्याकरिता शासनातर्फे संरक्षण ग्रहे चालविण्यात येतात. सदर गृहामध्ये महिलांना अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकिय, सोयी, पुरवून त्यांचे कुटुंबात पाठविणे. व्यवसाय, रोजगार, नौकरी, विवाह यासारख्या मार्गाचा अवलंब करुन पुनर्वसन करण्यात येते.

**३) आधारग्रहे सुधारित माहेर योजना :**

१६ ते ६० वर्षे वयापर्यंतच्या निराधार, कुमारी माता, परित्यकता, संकटग्रस्त व अत्याचाराला बळी पडलेल्या महीलांना आश्रय, सरक्षण व मुलभुत सुविधा पुरवून त्याचे पुनर्वसन करण्यासाठी स्वंयसेवी संस्थामार्फत आधरग्रहे चालविली जातात.सुधारित माहेर योजनेअंतर्गत महीलेस दरमहा २५० रुपये तिच्या सोबत असलेल्या पहिल्या मुलास दरमहा १५० रुपये व दुसऱ्या मुलास १०० रुपये अनुदार देण्यात येते. महिला स्वेच्छेने या ग्रहामध्ये प्रवेश करु शकतात. शासनाकडुन स्वयंसेवी संस्थेस प्रत्येक महिलेच्या पालण पोषणासाठी दरमहा ७५० रुपये देण्यात येते.

**४) महिला मंडळांना साहाय्यक अनुदान :**

नोदणीकृत महिला मंडळामार्फत प्रशिक्षण केंद्राद्वारे आर्थिकदृष्टया मागास कुटुंबातील महिलेस टंकलेखन,भरतकाम, खाद्यपदार्थ बनविणे, रेडिओ, टि.व्ही दुरुस्ती , शिवनकाम इ. प्रशिक्षण



330

Scanned with CamScanner

विकासाठीचा राजमार्ग खुला झाला आहे. उदा१९९३ चा महिला आयोग —महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे. राज्य घटनेने दिलेले मुलभूत आधिकार मिळावेत. सामाजीक गरजा व प्रतिष्ठा उंचावी म्हणुन आयोग स्थापन झाला. त्या अनुषगाने १९९४ मध्ये महिला धोरणाची आखणी करण्यात आली. व २००१ मध्ये सुधारीत महिला धोरण तयार करण्यात आले. ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक पातळीवरीर निर्णय प्रक्रीयेमध्ये महिलाचा सहभाग वाढला. महिलांच्या समान अधिकारांच्या संबंधीच्या विविध आंतरराष्ट्रीय करारांना भारत सरकारने मंजुरी दिली आहे.

**राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरणाची ध्येय व उददीष्टे :—**

१) महिलांच्या संपुर्ण विकासासाठी सकारात्मक आर्थिक, सामाजिक धारेणाच्या माध्यमातुन वातावरणनिर्मीती करणे.

२) राजकीय, आर्थिक, सामाजिक सांस्कृतीक व नागरी क्षेत्रात महिलांना समान हक्क व स्वातंत्र्य दिले पाहीजे.

३) राष्ट्राच्या सामाजिक,राजकीय आणि आर्थिक जीवनामध्ये महिलांना सहभागी होण्याची व निर्णय घेण्याची समान संधी असेल.

४) सर्वच पातळयांवर दर्जेदार शिक्षण, करिअर व व्यावसायीक सत्ता,नोकरी, समान वेतन, व्यावसायीक सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, आरोग्याची देखभाल करण्याची समान संधी महिलांना असेल.

५) महिलांचे शोषन करणाच्या सर्व प्रथा—परंपरा नष्ट करणारी बळकट स्थानिक संस्था निर्माण करणे.

६) सामुहिक कृतीमधे महिला व पुरूष यांचा समान सहभाग वाढविणारा दृष्टीकोन विकासीत करणे.

७) विकासाच्या प्रक्रीयेमध्ये स्त्रीवादी दृष्टीकोणाचा स्विकार करणे.

८) नागरी समाजातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला संघटना स्थापन करण्यावर भर द्यावा.

महिला चळवळी व बिगर शासकीय संघटना हयांच्या योगदानामुळे महिला धोरण आखले गेले. तरीसुध्दा राज्यघटनेने स्विकारलेली तत्वे प्रत्यक्षात येवु शकली नाहीत. कायदे मंडळ, धोरणे, योजना आखणारी यंत्रणा एका बाजुला तर दुसऱ्या बाजुला भारतातील महिलांच्या दर्जाची वस्तुस्थिती वेगळी आहे.महिलांच्या अनुकूल अशी धोरणे आखुन विकासाच्या प्रक्रीयेमध्ये महिलांचा परिणामकारक सहभाग वाढविला येतो.

**महिलांचे सामाजिक सक्षमीकरण :—**

महिलांच्या शैक्षणीक दर्जात सुधारणा तसेच व्यावसायीक तांत्रिक कौशल्य विकासीत करण्यावर भर असणे आवश्यक आहे. समाजाची मानसिकता आज बदलतांना दिसते हयाचे निर्देशक म्हणजे स्थावर मालमत्तेत महिलांचा वाटा व तिचे नाव असणे. महिलांचे सामाजीक प्रतीष्ठा उंचावण्यासाठी २००१ च्या महिला धोरणात सुधारणा करून विविध विभागांमार्फत योजना राबविण्यात आल्या त्यांचा उद्देश म्हणजे

१) महिलावरील अत्याचाराचे निराकरण करणे—

२) महिलांचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारणे

३) महिला संवेदनशील धोरणांना प्रोत्यासहन देणे.

४) प्रसारमाध्यमांच्या द्वारे महिलांचे हक्कांप्रती जनजागृती करणे.

५) निर्णय प्रक्रीयेत महिलांचा सहभाग वाढविणे.

महिला धोरणामुळे आज महिलांना कौटूंबिक दुय्यम दर्जाच्या लिंगभेदाच्या, न्युनगंडातुन व पुरूषी परावलंबीतत्वातुन बाहेर पडण्याची उमेद निर्माण झाली आहे. व स्त्रीयांचे सामाजीक सक्षमीकरण होतांना दिसत आहे.

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण :—**

सामाजीक विषमता निर्मुलन, गरीबी निर्मुलन कार्यक्रम हयामधुन महिलांच्या समस्या सोडविण्यास अग्रक्रम दिला पाहिजे. सामाजीक व आर्थिक विकासात उत्पादक व कामगार म्हणुन महिलांच्या योदगदानाची दखल घेणे आवश्यक आहे. महिलांना विविध प्रशिक्षण जसे फळप्रकीया उदयोग, कुक्कुटपालन असे शेतीपुरक व्यावसायीक मार्गदर्शनाचा ही फायदा होऊ शकतो. आज महिला रोजगार व स्वंयरोगार करून आर्थिकदृष्टया सक्षम होतांना दिसत आहेत.

**महिलांचे राजकीय सक्षमीकरण :—**

राजकीय सत्तेत महिलांना समान वाटा मिळाला



330

Scanned with CamScanner

पाहीजे. राजकीय प्रकीयेच्या सर्व पातळयावर होणाऱ्या निर्णयप्रकीयांमध्ये स्त्रीयाना समान संधी व सहभाग मिळायला हवा. आज स्त्रियांनी स्वत:च्या कर्तुत्वावर राजकारणात प्रतिनिधित्व मिळविले आहे. घटनादुरूस्तीमुळे त्रिस्तरीय पंचायती मध्ये तसेच नगरपालीका, महानगरपालीकामध्ये स्त्रियांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या तर स्त्रियांसाठी ३३टक्के अधिकारपदे राखीव ठेवण्यात आली.

या आरक्षणामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला मार्च २०१० रोजी सरकारने लोकसभा व विधानसभा यामधे महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक मांडले. त्यास राज्यसभेने मंजुरी दिली. आज महिलां कार्यक्षमता, पात्रता कौशल्ये हया द्वारे समाजात राजकीय क्षेत्रातही पुरूषांच्या बरोबरीने राजकीय क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवित आहेत.

**सारांश :—**

महिला सक्षमीकरणात स्त्रीयात सर्वागीन विकासाच्या दृष्टीने राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण आखले आहे. महिलांना प्रगतीच्या दिशेने वाटचालीस प्रारंभ केला आहे. आज राजकीय, सामाजीक, आर्थिक, सांस्कृतीक सर्वच क्षेत्रात महिलांची कामगीरी अतुलनीय आहे. महिलांच्या सामाजीक दर्जात वाढ झालेली दिसुन येते.

महिला सक्षमीकरणात राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण निश्चितच प्रगतीचा राजमार्ग ठरले आहे.

**संदर्भ :—**


१) महाराष्ट्र शासन : महिला धोरण २०११(maharashtra.gov.in)

२) स्त्री प्रश्नाची वाटचाल —विद्युत भागवत

३) महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख — डॉ. वैशाली पवार


❑❑❑

38

# महिला सबलीकरण व भारतीय संविधान


**प्रा. अमोल भाऊराव बंड,**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र,
आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे, जि. अमरावती


**********


**सारांश :**

कोणताही समाज हा नर आणि मादी म्हणजेच स्त्री व पुरूष या दोन घटकांपासूनच अस्तित्वात येत असतो. त्यामुळे दोन्ही घटकांना सारखेच महत्त्व असते परंतू भारतीय समाजामध्ये पुरूषसत्ताक कुटूंबपध्दती अस्तित्वात असल्यामुळे स्त्रीला दुय्यम स्थान प्राप्त झाले. त्यामुळे देशाची अर्धी शक्ती ही वाया गेली. भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष झाली. स्त्रियांनी वेगवेगळया क्षेत्रात आपली प्रगती केली. परंतु आजही ज्या प्रमाणात पाहीजे त्या प्रमाणात स्त्रियांना समाजामध्ये एक माणुस म्हणुन तिच्याकडे पाहिले जात नाही. ही आपल्या भारतीय समाजाची व्यथा आहे. गुलामगिरीच्या काळामध्ये भारतामध्ये स्त्रियांच्या संदर्भात बऱ्याच वाईट चालीरिती परंपरा अस्तित्वात होत्या. सतीप्रथा, बालविवाह, केशवपन, देवदासी, विधवा विवाहाला विरोध या अनिष्ट प्रथेविरूध्द समाजातील काही थोर समाजसुधारकांनी आवाज उठवुन समाजामध्ये जागृती निर्माण केली. व त्या वाईट चालीरिती बंद केल्या. त्याचप्रकारे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये भारतीय स्त्रीला एक माणूस म्हणुन योग्य दर्जा मिळावा याकरिता राज्यघटनेने वेगवेगळे कायदे व तरतुदी केल्या. जेणेकरून त्या समाजामध्ये प्रतिष्ठेने जीवन जगु शकतील. स्त्रियांना प्रतिष्ठेने जीवन जगता यावे. त्याचप्रमाणे त्यांना आपल्या व्यक्तीमत्वाचा सर्वागिण विकास करता यावा. त्यासाठी काही अधिकारांची आवश्यकता असते. म्हणून महिला सुध्दा सबल झाली पाहिजे. तिला तिचे जीवन सन्मानाने, प्रतिष्ठेने व स्वावलंबीपणे जगता यावे. तिला कोणतेही




Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

Smt. Sindhutai Jadhav Maha Vidyalaya Mehkar 330

Scanned with CamScanner